# निशाणी क्रमांक २८ वरील आदेश

(भारत सुर्यभान वि.महादेव सुर्यभान व इतर )

**१.** प्रस्तूत अर्ज वादीने प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशिर माफी रद्द करून मिळणेसाठी अभिलेखावर दाखल केलेला आहे.

**२.** अर्ज वाचला. प्रतिवादी क्र.१अ. ते १ ड. ने असे म्हणणे मांडले की, अर्जात किती दिवसाचा उशिर झालेला आहे ते नमूद केलेले नाही. प्रतिवादी क्र.१ विरूध्द मुदतीत दावा न आणल्यामुळे दावा अबेट झालेला आहे. प्रतिवादी क्र.१ हे दिनांक १५.०५.२०२१ रोजी मयत झालेले आहेत त्याबाबत पुरसीस निशाणी क्र.२७ ला दिनांक २०.१२.२०२२ रोजी दिलेली आहे व सदर अर्ज हा दिनांक ०४.०९.२०२३ रोजी दिलेला असल्यामुळे तसेच अर्जात संयुक्तीक कारण दिलेले नसल्याने सदरचा अर्ज हा नामंजूर करण्याची विनंती केली.

३. वादी व प्रतिवादींतर्फे त्यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद श्रवण केला.

**४.** अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ हे दिनांक १५.०५.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. मयत प्रतिवादी क्र.१ चे १अ) मंगळ महादेव तळेकर,१ब) भाऊसाहेब महादेव तळेकर,१क) मनिषा श्रीमंत गोरे व १ड. अनिषा संजय बोराटे हे कायदेशीर वारस आहेत. सदर अर्ज दाखल करण्यास जवळपास दोन वर्षांचा उशिर झालेला आहे. सदर अर्जाचे स्वरूप व तथ्य विचारात घेता तसेच, नैसर्गिक न्याय तत्वानुसार उभयपक्षकारांना त्यांची बाजू मांडण्यासाठी पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. तसेच, मुळ दावा गुण दोषावर अंतिमत: निर्गत करण्याच्या दृष्टीने प्रस्तूत अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. प्रस्तूत प्रकरण पुढे चालविण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे, प्रस्तूत अर्ज खर्च लादून मंजुर करणे योग्य व न्यायोचित होईल. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

०१. अर्ज निशाणी क्र. २८ मंजुर करण्यात येतो.

०२. वादीचा वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशिर माफीचा अर्ज रक्कम रू. ४००/- खर्च म्हणून प्रतिवादी क्र.१ चे वारस यांना एकत्रितरित्या देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

०३. प्रतिवादी क्र.१ विरूध्द अबेटमेंटचा आदेश याव्दारे रद्द करण्यात येतो.

०४. उभयपक्षांनी आदेशाची नोंद घ्यावी.

(प्रस्तुतच आदेश खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात येतो.)

Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2024.05.07 17:50:59 +0630

दिनांकः ०७/०५/२०२४.

(व्हि. व्हि. जोशी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.